मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सुनेत्रा पवार यांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

## लोकभवन येथे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवंगत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी (दि. ३१) सायंकाळी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.

शनिवारी संध्याकाळी लोकभवन येथे शपथविधी पार पडला. शपथविधीसाठी लोकभवनला येणाऱ्या समर्थकांनी फुले, पुष्पगुच्छ न आणण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या शपथविधीला दु:खाची झालर असल्याने अत्यंत साधेपणाने शपथविधी पार पडला.

शुक्रवारी सकाळी अजित पवारांचे अस्थिविसर्जन होताच दुपारी बाराच्या सुमारास सुनील तटकरे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादीचे बडे नेते



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या बैठकीसाठी वर्षा बंगल्यावर पोहोचले. या बैठकीत त्यांनी सुनेक्षा पवार यांना उपमुख्यमंत्री करण्याचा प्रस्ताव मांडला. मुख्यमंत्र्यांनी या प्रस्तावाला होकार दिल्यानंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी सुनेत्रा पवारांची भेट घेतली. या भेटीत राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या विनंतीला सुनेत्रा पवारांनी संमती दिली.

शनिवारी दुपारी राष्ट्रवादीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीत विधिमंडळ पक्षाच्या नेत्या म्हणून सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली. या भेटीनंतर राष्ट्रवादी पक्षाचे नेते मुख्यमंत्र्यांकडे पोहोचले. या बैठकीत राष्ट्रवादीच्या नेत्यांनी देवेंद्र फडणवीसांना सुनेत्रा पवारांच्या निवडीचे पत्र दिले. यानंतर संध्याकाळी पाच वाजता शपथविधी पार पडला.

अजित पवारांच्या जाण्याने अवघे पवार कुटुंब कोसळून गेले आहे. त्यांची दोन्ही मुले राजकारणात अजून नवखी असल्याने त्यांना पुढे करण्याचा निर्णय राष्ट्रवादीच्या नेत्यांना घ्यावा लागला आहे. त्यासाठी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपद सांभाळण्यासाठी राजी करण्यात आले.

### कचऱ्याचे असे करा विलगीकरण

» शरद पवार यांनी शनिवारी सकाळी पत्रकार परिषद घेऊन सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत याबाबत कोणतीही कल्पना नाही अशी प्रतिक्रिया दिली होती. या शपथविधीला शरद पवार अनुपस्थित होते. सुप्रिया सुळे यांनी दुपारी काटेवाडीत आशाताई पवार (अजितदादांच्या मातोश्री) यांची भेट घेतली. 'मी काकूंना भेटायला आले होते. उद्या (रविवारी) केंद्रीय अर्थसंकल्प असल्याने मी इथून दिल्लीला रवाना होणार आहे', अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळेंनी दिली. शपथविधीबाबत मला कल्पना नाही, असं सांगत त्यांनी अधिक भाष्य करणे टाळले.निवडीचे पत्र दिले. संध्याकाळी पाच वाजता शपथविधी पार पडला.

# पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात भाजप नगरसेवकांच्या गटाची नोंदणी

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांच्या गटनेतेपदी श्री. प्रशांत शितोळे यांची अधिकृत निवड करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांच्या गटनेतेपदी श्री. प्रशांत शितोळे यांची अधिकृत निवड करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी शनिवारी (दि.३१) दिली. दरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील नवनिर्वाचित नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत नगरसेवकांच्या गटाची अधिकृत नोंदणी केली आहे.

याबाबत आमदार शंकर जगताप म्हणाले, पिंपरी चिंचवड



शहरामध्ये भाजपने अभूतपूर्व यश मिळवले. शहरामध्ये भाजपच्या माध्यमातून गेल्या नऊ वर्षात अनेक सुविधा निर्माण झाल्या. नागरिकांना अत्याधुनिक मेट्रो सुविधेपासून चांगले रस्ते, पाणी व्यवस्थापन, करप्रणालीत सुसूत्रता, कचऱ्याचे नियोजन, सक्षम आरोग्य योजना अशा सर्वंकष विकासावर ‘फोकस’ ठेवला. यामुळे नुकत्याच पार पडलेल्या मनपा निवडणुकीमध्ये नागरिकांनी भाजपला भरभरून प्रतिसाद दिला. शहरवासीयांनी भाजपाला एक हाती कौल दिलेला आहे. नागरिकांचा हा विश्वास भाजप सार्थ केल्याशिवाय राहणार नाही. आगामी काळात नागरिकांना आवश्यक सुविधा देण्याबरोबरच सुरक्षित, पर्यावरण पूरक शहराची अनुभूती देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. याच माध्यमातून आज अनुभवी प्रशांत शितोळे यांना गटनेता म्हणून निवड केलेली आहे

पालिकेच्या माध्यमातून केली जाणारी कामे नागरिकांच्या हिताच्या दृष्टीत कोणातूनच केली जातील. यासाठी प्रशांत शितोळे यांच्या अनुभवाचा नक्कीच सर्वच नगरसेवकांना फायदा होणार आहे. सर्वांना सोबत घेऊन, सर्वांच्या विचाराने ते काम करतील असा विश्वास सर्वांनाच आहे. श्री. प्रशांत शितोळे यांच्या नेतृत्वाखाली भाजप नगरसेवक सकारात्मक आणि परिणामकारक कामकाजावर लक्ष केंद्रित करतील. नगर विकास, नागरिक सेवा आणि शहराच्या प्रगतीसाठी भाजप सदैव सक्रिय राहणार असल्याचे जगताप यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांच्या गटनेतेपदी श्री. प्रशांत शितोळे यांची अधिकृत निवड करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी शनिवारी (दि.३१) दिली. दरम्यान पिंपरी चिंचवड शहरातील नवनिर्वाचित नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीत नगरसेवकांच्या गटाची अधिकृत नोंदणी केली आहे.

# “दादा मला माफ करा..” आमदार महेश लांडगे यांचे भावनिक वक्तव्य

## पिंपरी-चिंचवड शहरात स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात आज स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शोकसभेमध्ये भारतीय जनता पक्षाचे भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. अवघ्या चाळीस सेकंदांच्या भाषणात त्यांनी भावनिक शब्दांत “दादा, मला माफ करा,” असे म्हणत आपली भावना व्यक्त केली आणि तेथून मंचावरून निघून गेले. त्यांच्या या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये क्षणभर शांतता पसरली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकांदरम्यान अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष पाहायला मिळाला होता. त्या काळात करण्यात आलेली टीका आणि एकेरी उल्लेख अजित पवारांच्या जिव्हारी लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात झाली होती.

शोकसभेत मात्र राजकीय मतभेद बाजूला ठेवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महेश लांडगे यांच्या भावनिक वक्तव्यामुळे या कार्यक्रमाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले असून, राजकारणापलीकडे जाऊन व्यक्त केलेली ही भावना असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुद्यावरुन अजित पवारांवर हल्लाबोल करणारे भाजप आमदार महेश लांडगे काल अजित पवारांच्या आठवणीने भावूक झाले.



### महेश लांडगे देखील अत्यंत भावुक झाल्याचे दिसून आले

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुद्यावरुन महेश लांडगे आणि अजित पवार यांच्यात जोरदार आरोप प्रत्यारोप झाले होते. महानगरपालिकेत भाजपच्या मोठ्या प्रमाणात जागा पिंपरी चिंचवडमध्ये निवडून आल्या. परंतु महानगरपालिकांच्या निवडणूक निकालानंतर पंधरा दिवसांतच अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने पिंपरी चिंचवड शहराचा विकास करण्यात मोठा वाटा असलेल्या अजित पवारांच्या जाण्याने शोक व्यक्त केला जात आहे. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहताना महेश लांडगे देखील अत्यंत भावुक झाल्याचे दिसून आले. दादा मला माफ करा, असे म्हणत त्यांनी श्रद्धांजली वाहिली

### आमदार महेश लांडगे यांचे भावनिक वक्तव्य

» पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात मोठ्या प्रमाणात आरोप-प्रत्यारोप झाले होते. अजित पवार यांच्या निधनानंतर आमदार महेश लांडगे यांनी त्यांची माफी मागितली आहे. चिंचवड येथे अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्व पक्षीय, सामाजिक संघटना, संस्था यांच्यावतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आमदार महेश लांडगे बोलत होते.

दादा मला माफ करा, असे म्हणत महेश लांडगे यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.

या शोकसभेमध्ये भारतीय जनता पक्षाचे भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेसमोर हात जोडून श्रद्धांजली अर्पण केली. अवघ्या चाळीस सेकंदांच्या भाषणात त्यांनी भावनिक शब्दांत “दादा, मला माफ करा,” असे म्हणत आपली भावना व्यक्त केली आणि तेथून मंचावरून निघून गेले. त्यांच्या या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये क्षणभर शांतता पसरली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकांदरम्यान अजित पवार आणि महेश लांडगे यांच्यात तीव्र राजकीय संघर्ष पाहायला मिळाला होता. त्या काळात करण्यात आलेली टीका आणि एकेरी उल्लेख अजित पवारांच्या जिव्हारी लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात झाली होती. शोकसभेत मात्र राजकीय मतभेद बाजूला ठेवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महेश लांडगे यांच्या भावनिक वक्तव्यामुळे या कार्यक्रमाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले असून, राजकारणापलीकडे जाऊन व्यक्त केलेली ही भावना असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

# पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे शिल्पकार अजितदादा; स्मारक व पुतळ्याची सर्वपक्षीय मागणी

## शोकसभेत मान्यवरांचे भावनिक मनोगत; नव्या महापालिका भवनात भव्य पुतळा उभारण्याचा प्रस्ताव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा विकास अजितदादा पवार यांनी केला आहे. त्यांच्याकडे असलेल्या दूरदृष्टीमुळे हे पिंपरी-चिंचवड शहर बेस्ट सिटी म्हणून ओळखले जाते. ते शहरासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी शहरात त्याचे भव्य स्मारक उभारले जावे. नव्या महापालिका भवन इमारतीच्या दर्शनी आवारात त्यांचा भव्य पुतळा उभारावा. महापालिकेच्या सर्व नाट्यगृहात त्यांचे तैलचित्र लावले जावे, अशा सूचना शुक्रवारी (दि.30) झालेल्या शोकसभेत विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून करण्यात आल्या.

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि.28) बारामती येथे विमान अपघातात निधन झाले. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सर्व पक्षीय शोकसभा झाली. शोकसभेत विविध पक्षांचे राजकीय नेते, पदाधिकारी, शहराध्यक्ष, नगरसेवक, पत्रकार व इतर क्षेत्रातील मान्यवरांची आपले अनुभव कथन केले.

बारामती ही त्यांची जन्मभूमी असली तरी, पिंपरी-चिंचवड ही त्यांची कर्मभूमी होती. त्यांचे शहरावर विशेष प्रेम होते. दूरदृष्टी ठेवून त्यांनी शहरात प्रशस्त रस्ते तसेच, पायाभूत सुविधा विकसित केल्या. शहराला बेस्ट सिटी म्हणून ओळख दिली. त्यामुळे शहरात राहण्यास मोठी पसंती दिली जात आहे, असे अनेकांनी मत प्रदर्शन केले.

अजितदादा हे कधीच जातीभेद मानत नव्हते. त्यांनी कार्यकर्त्यांना नेहमी बळ दिले. त्यांनी माझ्यासारख्या पंजाबी तरुणास पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौर, दोन वेळा शहराध्यक्ष तसेच, स्थायी समिती अध्यक्ष केले. पिंपरी-चिंचवड शहरासाठी त्यांची तळमळ मी जवळून पाहिली आहे, असे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल म्हणाले.



### महापालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल

» अजितदादांबाबत अनेकांनी आपली मते व्यक्त केली. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी अनेकांनी सूचना केल्या आहेत. त्यासाठी एकत्रित येऊन सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल. त्यांच्या स्मृती जागृत ठेवल्या जातील. चिंचवड येथील नवीन महापालिका भवनाच्या आवारात अजितदादांचा भव्य पुतळा उभारला जाईल. तसेच, भाऊसाहेब भोईर यांनी सूचना केल्याप्रमाणे शहरातील सर्व नाट्यगृहात अजितदादांचे तैलचित्र लावले जाईल. सत्तारूढ भाजपा पक्षाकडून विरोधकांचा पूर्ण सन्मान केला जाईल, असे भाजपाचे आमदार शंकर जगताप यांनी ग्वाही दिली.

# प्रामाणिक करदात्यावर भार नको, उत्पन्नवाढीचे पर्याय सुचवा

## महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देत, प्रामाणिक करदात्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकू नये, अशी ठाम भूमिका मांडली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने यंदा कर आकारणी व कर संकलन दरात वाढ करण्याचा विचार सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी या करवाढीस तीव्र विरोध दर्शविला आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देत, प्रामाणिक करदात्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकू नये, अशी ठाम भूमिका मांडली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पुणे महापालिकेने गेल्या काही वर्षांत कर दरात वाढ केलेली नसली, तरी उत्पन्न वाढीसाठी करवाढ हा एकमेव मार्ग नाही. प्रशासनाने अंदाजपत्रकात २८४७ कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित धरले होते, मात्र प्रत्यक्षात २२०० ते २३०० कोटी रुपयांपर्यंतच करसंकलन झाले आहे. ही तूट करवाढ करून भरून काढण्याऐवजी, सध्याच्या व्यवस्थेतील त्रुटी दूर करून उत्पन्न वाढवता येऊ शकते, असा दावा त्यांनी केला आहे.




### 'चेंज ऑफ यूज'

» निवासी भागांमध्ये व्यावसायिक वापर होत असतानाही 'चेंज ऑफ यूज' प्रमाणपत्राच्या अडचणींमुळे कर आकारणी होत नसल्याचे निवेदनात नमूद आहे. आर-१ आणि आर-२ विभागांतील परवानगी असलेल्या व्यावसायिक वापरावर थेट कर आकारणी करणे शक्य असतानाही ती टाळली जाते. मुख्य रस्त्यांवरील जुन्या घरांमध्ये सुरू असलेली दुकाने, पार्किंगमध्ये तयार केलेले गोडाऊन आणि झोपडपट्ट्यांमधील व्यावसायिक वापर यावर कर आकारणी न झाल्यामुळे महापालिकेचे मोठे उत्पन्न बुडत असल्याचा दावा करण्यात आला.

विशेषतः २३ गावांमधील नागरिकांकडून कर वसुली न करण्याचे शासनाचे आदेश असतानाही, या भागातून २६८ कोटी रुपयांचा मालमत्ता कर नागरिकांनी स्वेच्छेने भरल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. यावरून नागरिक कर भरण्यास तयार आहेत, मात्र कर आकारणीची प्रक्रिया सुलभ असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कर आकारणी विभागातील कामकाजावरही त्यांनी टीका केली. नवीन कर लावण्यासाठी फाइल्स मंजुरीसाठी विविध पातळ्यांवर अडकून पडतात. पेठ निरीक्षक, विभागीय निरीक्षक, विशेष अधिकारी आणि सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख अशा अनेक टप्प्यांमधून फाइल फिरते. ही प्रक्रिया अनावश्यक असून, ती कमी केल्यास कर आकारणीला गती मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र मिळाल्यानंतर तात्काळ कर आकारणी व्हायला हवी, मात्र प्रत्यक्षात अनेक मिळकती वर्षानुवर्षे कराच्या कक्षेबाहेर राहतात, असा आरोपही करण्यात आला.

### महापालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल

» अभय योजनेद्वारे थकबाकीदारांना सवलत दिली जाते आणि नियमित कर भरणाऱ्यांनाच जादा भार सहन करावा लागतो, हे पुणे शहरासाठी योग्य नसल्याचे त्यांनी नमूद केले. या संपूर्ण विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी आयुक्तांनी वेळ द्यावा, तसेच कर वाढ न करता महापालिकेचे उत्पन्न कसे वाढवता येईल, याबाबतचा सविस्तर दस्तऐवज सादर करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### कर न भरणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करावे

» जर अशा सर्व व्यावसायिक मिळकती शोधून त्यांच्यावर कर लावण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली, तर किमान ५०० ते १००० कोटी रुपयांपर्यंत उत्पन्न वाढू शकते, असा अंदाज माजी नगरसेवकांनी व्यक्त केला आहे. प्रामाणिक करदात्यांवर करवाढ लादण्याऐवजी कर न भरणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

निवासी भागांमध्ये व्यावसायिक वापर होत असतानाही 'चेंज ऑफ यूज' प्रमाणपत्राच्या अडचणींमुळे कर आकारणी होत नसल्याचे निवेदनात नमूद आहे. आर-१ आणि आर-२ विभागांतील परवानगी असलेल्या व्यावसायिक वापरावर थेट कर आकारणी करणे शक्य असतानाही ती टाळली जाते. मुख्य रस्त्यांवरील जुन्या घरांमध्ये सुरू असलेली दुकाने, पार्किंगमध्ये तयार केलेले गोडाऊन आणि झोपडपट्ट्यांमधील व्यावसायिक वापर यावर कर आकारणी न झाल्यामुळे महापालिकेचे मोठे उत्पन्न बुडत असल्याचा दावा करण्यात आला.


---

# नवले ब्रिजवर 'या' कालावधीत 3 दिवस वाहतूक बंद राहणार

## पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज दरम्यान स्पीड नियंत्रण कॅमेरे गॅन्ट्री बसविण्यासाठी वाहतूक बंद करण्यात येणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज दरम्यान स्पीड नियंत्रण कॅमेरे गॅन्ट्री बसविण्यासाठी ३ ते ५ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत (दोन तास) साताराकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे.




या बदलांमुळे होणारी संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या प्रवाशांनी आपल्या प्रवासाचे नियोजन आधीच करावे. तसेच या दरम्यान नागरिकांनी कात्रज जुना बोगदा आणि सेवा रस्त्यांचा वापर करावा, असे आवाहन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कार्यालयाचे प्रकल्प संचालक यांनी केले आहे.

पुण्यातील अपघातप्रवण 19 रस्त्यांच्या यादीत नवले पूल हा सर्वाधिक धोकादायक रस्ता ठरला आहे. या मार्गावर सातत्याने अपघात होत असल्याने वाहनचालकांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे वाहतूक पोलिसांनी कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज दरम्यान 40 किमी प्रतितास वेगमर्यादा लागू केली आहे. याआधी येथे 30 किमी प्रतितास वेगमर्यादा होती. वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनचालकांवर सीसीटीव्ही, स्पीड गन आणि नव्याने बसविण्यात येणाऱ्या स्पीड कॅमेऱ्यांमार्फत कारवाई केली जाणार आहे.

पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज या टप्प्यावर स्पीड नियंत्रणासाठी कॅमेरे व गॅन्ट्री बसवण्याच्या कामासाठी 3 ते 5 फेब्रुवारी दरम्यान सकाळी 6 ते 8 वाजेपर्यंत साताराकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक तात्पुरती बंद ठेवण्यात येणार आहे. या काळात नागरिकांनी कात्रज जुना बोगदा आणि सेवा रस्त्यांचा वापर करण्याचे आवाहन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कार्यालयाचे प्रकल्प संचालक यांनी केले आहे.

### अपघातप्रवण 19 रस्त्यांच्या यादीत नवले पूल

» पुण्यातील अपघातप्रवण 19 रस्त्यांच्या यादीत नवले पूल हा सर्वाधिक धोकादायक रस्ता ठरला आहे. या मार्गावर सातत्याने अपघात होत असल्याने वाहनचालकांसह नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे वाहतूक पोलिसांनी कात्रज नवीन बोगदा ते नवले ब्रिज दरम्यान 40 किमी प्रतितास वेगमर्यादा लागू केली आहे. याआधी येथे 30 किमी प्रतितास वेगमर्यादा होती. वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनचालकांवर सीसीटीव्ही, स्पीड गन आणि नव्याने बसविण्यात येणाऱ्या स्पीड कॅमेऱ्यांमार्फत कारवाई केली जाणार आहे.

# नीरा नदी प्रदूषणाबाबत पाहणी दौरा का केला?

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थींचे विसर्जन झाल्यानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नीरा नदीच्या प्रदूषणाबाबत पाहणी केली.

**पुणे | प्रतिनिधी**

शरद पवार यांनी बारामती येथे गोविंद बागेत प्रसार माध्यमांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थींचे विसर्जन झाल्यानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नीरा नदीच्या प्रदूषणाबाबत पाहणी केली. सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद दिले जाणार असल्याच्या चर्चेवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शनिवारी बारामतीमध्ये पत्रकारांशी बोलताना भाष्य केले. त्याचप्रमाणे, नीरा नदीच्या पाहणीबाबतही त्यांनी भूमिका मांडली.

शरद पवार यांनी बारामती येथे गोविंद बागेत प्रसार माध्यमांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अस्थींचे विसर्जन झाल्यानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी नीरा नदीच्या प्रदूषणाबाबत पाहणी केली. याबाबतही शरद पवार यांनी शनिवारी स्पष्टीकरण दिले. 'अजितदादा गेल्यानंतर तुम्हाला पुन्हा एकदा मैदानात उतरून काम करावे लागेल, असे वाटते का? त्याच दृष्टीने नदीची पाहणी तुम्ही केली का,' असे पत्रकारांनी विचारले असता, पवार म्हणाले, 'आमची जी नवी पिढी आहे तिला प्रोत्साहित करणे आणि अजितदादांच्या जाण्यामुळे जे नुकसान झाले आहे ते भरून काढण्यासाठी जे जे करता येईल ते करणे महत्त्वाचे आहे.'

'पाणी प्रदूषणामुळे फार लोकांना यातना आहेत,' असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराला एक दिवस उलटत नाही, तोच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या पक्षामध्ये राजकीय घडामोडी सुरू झाल्या असून, खासदार सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीचीपदाची शपथ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची पवार कुटुंबाला पूर्वकल्पना नसल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी याविषयी माहिती नसल्याचे सांगितले.

शरद पवार म्हणाले, 'सुनेत्रा पवार यांनी शपथ घेण्याचा निर्णय हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत निर्णय आहे. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, पक्षाचे प्रमुख तो त्यांचा अधिकार आहे. त्यांनी काय ठरवले, त्यावर भाष्य करणार नाही. सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल मला माहिती नाही. सुनेत्रा पवारांसोबत कोणतीही चर्चा झालेला नाही.'

पवार कुटुंबातील सून महाराष्ट्राची पहिली महिला उपमुख्यमंत्री होणार आहे, त्याबाबत तुमच्या मनात काय भावना आहेत, असा प्रश्न विचारला असता पवार म्हणाले, 'घडलेली घटना अत्यंत दुःखदायकच आहे; पण तरी काम चालू ठेवण्यासाठी कोणाला तरी पुढे यावे लागते. पुढे येऊन जबाबदारी घ्यायला लागते. यामुळे सामान्य जनतेमध्ये विश्वास निर्माण होण्यास मदत होऊ शकते.'

सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद दिले जाणार असल्याच्या चर्चेवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शनिवारी बारामतीमध्ये पत्रकारांशी बोलताना भाष्य केले. त्याचप्रमाणे, नीरा नदीच्या पाहणीबाबतही त्यांनी भूमिका मांडली.



### महाराष्ट्राची पहिली महिला उपमुख्यमंत्री

**» पवार कुटुंबातील सून महाराष्ट्राची पहिली महिला उपमुख्यमंत्री होणार आहे, त्याबाबत तुमच्या मनात काय भावना आहेत, असा प्रश्न विचारला असता पवार म्हणाले, 'घडलेली घटना अत्यंत दुःखदायकच आहे; पण तरी काम चालू ठेवण्यासाठी कोणाला तरी पुढे यावे लागते. पुढे येऊन जबाबदारी घ्यायला लागते. यामुळे सामान्य जनतेमध्ये विश्वास निर्माण होण्यास मदत होऊ शकते.'**

### राष्ट्रवादी एकत्र येण्याचे अजित पवार यांचे स्वप्न

**» 'राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी' एकत्र येण्याबाबत विचारणा करण्यात आली असता, ज्येष्ठ नेते शरद पवार म्हणाले, 'दोन्ही 'राष्ट्रवादी' एकत्र येण्याचे अजित पवार यांचे स्वप्न होते. त्या दृष्टीने चर्चा सुरू झाल्या होत्या.'**

# टेमघर प्रकल्पग्रस्तांना दिलासा : 26 कोटींच्या वाढीव मोबदल्याचा मार्ग अखेर मोकळा

## न्यायालयाच्या आदेशानंतर जलसंपदा विभागाकडून निधी जमा; शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच रक्कम

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या टेमघर प्रकल्पग्रस्तांना भूसंपादनासाठीचा वाढीव मोबदला मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाने यासाठी 39 प्रकरणांमधील शेतकऱ्यांना 26 कोटी 14 लाख रुपयांचा निधी कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे जमा केला आहे. पुढील काही दिवसांत हा निधी न्यायालयात जमा करण्यात येणार आहे. त्यानंतर तो शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार असल्याची माहिती जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

जिल्हा सत्र न्यायालयाने अडीच वर्षांपूर्वी टेमघर प्रकल्पग्रस्तांसाठी वाढीव मोबदला देण्याचे आदेश दिला होता. मात्र, त्यानंतरही संबंधित शेतकऱ्यांना तो देण्यात आला नव्हता. त्यानंतर न्यायालयाने भूसंपादन कार्यालयातील खुर्ची जप्तीचे दोन वेळा आदेश दिले होते.

गेल्या आठवड्यात शेतकरी आणि न्यायालयाच्या बेलिफ यांनी जिल्हा प्रशासनाच्या भूसंपादन अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील खुर्चीच्या जप्तीची कारवाई करण्याबाबत आग्रह धरला होता. त्यानंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच भूसंपादन समन्वयक डॉ. कल्याण पांढरे यांनी कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांच्याशी चर्चा केली होती. धुमाळ यांनी तत्काळ अतिरिक्त मुख्य सचिवांशी बोलून यात मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्याला प्रतिसाद देत सचिवांनी पुढील आठ दिवसांत हा वाढीव मोबदला देण्याचे देण्याचे मान्य केले होते. त्यानुसार जलसंपदा विभागाने 39 भूसंपादन प्रकरणांमधील शेतकऱ्यांना 26 कोटी 14 लाख 94 हजार 880 रुपयांचा निधी महामंडळाकडे जमा केला आहे. हा निधी आता न्यायालयाच्या निर्देशांनुसार तेथेच जमा करण्यात येईल. पुढील काही दिवसात ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून त्यानंतर हा निधी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे.



### टेमघर धरणग्रस्तांना वाढीव मोबदला

**» जिल्हा सत्र न्यायालयाने टेमघर धरणग्रस्तांना वाढीव मोबदला देण्याचे आदेश देऊन दोन वर्षे उलटली. मात्र, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने मोबदला न दिल्याने न्यायालयाने विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांच्या मालमत्ता जप्तीच्या कारवाईचे आदेश गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये दिले होते. त्यावेळी जिल्हा प्रशासनाने जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा करून पुढील दोन महिन्यांत अर्थात ऑक्टोबरमध्ये हा मोबदला न्यायालयात जमा करून शेतकऱ्यांना देण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले होते.**